N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सोलापुर शहर **P.S.(ठाणे):** सदर बाज़ार

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0105 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 16/02/2023 22:40

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 16/02/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 16/02/2023
**Time From (वेळेपासून):** 12:50 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:20 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 16/02/2023 **Time (वेळ):** 22:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 035
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 16/02/2023 22:40 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सहाअभियंता गलीच्छ वस्ती सुधार,विभाग,कक्षामध्येमहानगर पालिका ,सोलापूर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): अंबादास अर्जुन शिंदे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1983

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 71/72,श्रीशैल नगर, भवानी पेठ,सोलापूर,सदर बाज़ार,सोलापुर शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 71/72,श्रीशैल नगर, भवानी पेठ,सोलापूर,सदर बाज़ार,सोलापुर शहर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9970619939

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुनिल नेमीनाथ लामकाने | | | 1. सहाअभियंता गलीच्छ वस्ती सुधार,विभाग, महानगर पालिका सोलापूर,सोलापूर,सदर बाज़ार, सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दि:- 16/02/2023

मी अंबादास अर्जुन शिंदे, वय-40 वर्षे, व्यवसाय - शासकीय कॉन्ट्रॅक्टर, रा. घर नं. ई 71/72, श्रीशैल नगर, भवानी पेठ, सोलापूर (9970619939), समक्ष उपस्थित राहुन फिर्याद देतो की,

मी दि. 08/02/2023 रोजी अँन्टीकरप्शन ब्युरो सोलापूर येथील पोलीस निरीक्षक श्री महाडिक यांचे समक्ष उपस्थित राहून माझ्याकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत थोडक्यात तक्रार सांगीतली. माझ्या तक्रारीवर पुढील कार्यवाही करण्याकरीता पोनि महाडिक यांनी दोन शासकीय पंच उपलब्ध करुन घेतले व सदर ठिकाणी माझी व दोन्ही पंचांची एकमेकांशी ओळख करून दिली. त्यानंतर पोनि महाडिक यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी सांगीतलो की,

मी एक शासकीय कॉन्ट्रॅक्टर असुन सोलापूर महानगरपालिका हद्दीत शासकीय रस्त्यांचे कामे घेत असतो. मला सोलापूर महानगरपालिका येथील गलीच्छ वस्ती सुधारणा विभागाकडुन शेळगी ते स्मशानभुमी येथील डांबरी रस्ता चे कान मिळाले होते. सदरचे काम पुर्ण झालेनंतर त्या कामाच्या मोजमापे पुस्तकावर सहा. अभियंता श्री लामकाने यांनी माहे डिसेंबर मध्ये सही केली होती. त्याचा मोबदला म्हणुन 6,000/- रुपये व प्रभाग क्रं. 03 अ मधील बारामती बँक ते आकाशगंगा मंदीर येथील डांबरी रस्ता करणे या कामाच्या मोजमापे पुस्तकावर सही करण्याकरीता 7,000/- रुपये अशी एकुण 13,000/- रूपये सहा. अभियंता लामकाने हे माझ्याकडे लाचेची मागणी करीत असुन मला सोलापूर महानगरपालिक येथील गलीच्छ वस्ती सुधारणा विभाग येथे बोलाविले आहे. तरी सहा. अभियंता लामकाने यांच्यावर योग्य ती कारवाई करावी ही विनंती अशी तक्रार सांगीतली व तशी सविस्तर तक्रार हस्तलिखित नांेदविली.

त्यानंतर पोनि महाडिक यांनी सहा. अभियंता लामकाने यांचेवर पडताळणी कारवाई करण्याचे ठरविले. सदरवेळी मी त्यांना सांगीतले की, मी माझ्या परिचयातील इसमाकडुन माहिती घेतली असता लामकाने हे बाहेर साईटवर गेले असुन संध्याकाळी 17.00 वा. कार्यालयात येणार आहेत. त्यामुळे आम्ही सर्वजण अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात थांबुन राहीलो. त्यानंतर मी पुन्हा 17.00 वा.चे नंतर लामकाने हे कार्यालामध्ये आले आहेत का? याबाबत माहिती घेतली असता मला समजले की, लामकाने हे साईट पाहणी करून परस्पर त्यांच्या घरी जाणार असुन ते कार्यालयात येणार नाहीत. सदरबाबत मी पोनि महाडिक यांना तसेच दोन्ही पंचाना माहीती दिली. त्याबाबत माझा सविस्तर जबाब नोंद करण्यात आला व मला लामकाने यांच्याबाबत माहिती घेवुन अॅन्टी करप्शन ब्युरो सोलापूर कार्यालयात हजर राहण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर मी माझ्या कामानिमित्त विजापूर नाका येथे जात असतेवेळी मला नियोजन भवन जवळ लामकाने रस्त्यामध्ये भेटले. सदरवेळी लामकाने यांनी माझ्या कामाचा विषय काढुन सदर कामाची प्रथम अतिरिक्त आयुक्त श्री कारंजे यांचेकडुन पाहणी होणार आहे व त्यानंतरच मी फोन केल्यानंतर मला भेटण्यास ये असे सांगीतले. सदरबाबत मी पोनि महाडिक यांना फोन द्वारे माहिती दिली. त्यानंतर दि. 15/02/2023 रोजी मी केलेल्या बारामती बँक ते आकाशगंगा मंदीर येथील डांबरी रस्त्याच्या कामाची अतिरिक्त आयुक्त श्री कारंजे यांनी पाहणी करुन मी केलेले काम योग्य असल्याबाबत लामकाने यांना सांगीतले. त्यानंतर आज दि. 16/02/2023 रोजी सकाळी 10.30 वा. चे सुमारास मला सहा. अभियंता लामकाने यांचा फोन आला व त्यांनी मला 12.30 वा. चे सुमारास फोन करुन भेटण्यास संागीतले. त्याबाबत मी तात्काळ पोनि महाडिक यांना माहिती देवुन अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय सोलापूर येथे हजर झालो. तेथे काहीवेळातच दि. 08/02/2022 रोजी झालेल्या पडताळणी कारवाईमध्ये पंच म्हणून काम केलेले दोन्ही पंच उपस्थित झाले. सदर ठिकाणी पोनि महाडिक यांनी पुन्हा त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याची संपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचाना देवून त्या व्हाईस रेकॉर्डमध्ये त्यांचेकडील नवीन मेमरीकार्ड टाकले त्यानंतर लामकाने यांचेवर पडताळणी कारवाई करण्याच्या अनुषगाने ठिकाण निश्चित करण्याकरीता पोनि महाडिक यांचे सुचनेवरुन मी माझ्या मोबाईलवरुन लामकाने यांना फोन केला असता, त्यांनी मला पार्क चौक येथील फोर जी चहाचे कॅन्टीजवळ

बोलाविले असल्याचे निष्पन्न झाले.
त्यानंतर सहा. अभियंता लामकाने यांचेवर पडताळणी कारवाई करण्याचे अनुषंगाने मला तसेच पंच 01 यांना पोनि महाडिक यांनी योग्य त्या सुचना देवुन, त्यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 यांना माझ्याकडील मोटार सायकलवरुन पार्क चौक येथील फोर जी चहा कॅन्टीन येथे जाणेकरीता पाठविले. सदर ठिकाणी मी व पंच 01 असे गेलो असता, तेथे लामकाने उपस्थित नव्हते. त्यामुळे मी व पंच त्यांची वाट बघत तेथेच थांबलो. बराच वेळ होवुन लामकाने आले नसल्याने मी त्यांना फोन केला असता, ते आलो आलो असे म्हणुन फोन कट केला. त्यानंतर अजुन थोडावेळ वाट पाहुन पुन्हा फोन केला असता, त्यांनी निघालो असे सांगुन फोन कट केला. त्यानंतर काहीवेळातच लामकाने सदर ठिकाणी आले. सदर ठिकाणी माझ्यामध्ये व लामकाने यांच्यामध्ये माझ्या प्रलंबित कामाबाबत चर्चा झाली. त्यानंतर लामकाने यांनी हाताने पैश्याचा इशारा करुन आमच संपवुन टाका की असे म्हणुन माझ्याकडे लाचेची मागणी केली व मागील कामाचा मोबदला म्हणुन 6,000/- रुपये व सध्याच्या कामाचे लाच म्हणुन 7,000/- रुपये असे मिळुन माझ्याकडे 13,000/- रुपयांची मागणी केली व सदरची लाच रक्कम सोलापूर महानगरपालिका येथील गलीच्छ वस्ती सुधारणा विभाग येथे घेवुन येण्यास सांगीतल्याने मी पंच 01 यांच्यासह पुन्हा अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात परत आलो. तेथे पोनि महाडिक यांनी मला व पंच 01 यांना हकीकत विचारुन तसेच व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण खात्री केली.
त्यानंतर सहा. अभियंता लामकाने यांच्यावर सापळा कारवाई करण्याच्या अनुषंगाने सर्व सापळापुर्व कार्यवाही करण्यात आली व मी हजर केलेली लाच रक्कम 13,000/- रुपयांच्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा माझ्या शर्टच्या समोरील डावे बाजुच्या खिशामध्ये ठेवण्यात आली. त्यानंतर मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना त्यांच्या-त्यांच्या कामाच्या अनुषंगाने पोनि महाडिक यांनी योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर लामकाने यांच्यावर सापळा कारवाई करण्याकरीता व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 यांना माझ्याकडील मोटार सायकलवरुन सोलापूर महानगरपालिका येथील गलीच्छ वस्ती सुधारणा विभाग येथे रवाना केले. तसेच आमचे पाठोपाठ पोनि महाडिक पंच 02 व सापळा पथक असे शासकीय वाहनातुन सदर ठिकाणी येवुन परिसरात सापळा लावुन थांबले. त्यानंतर मी व पंच 01 असे लामकाने यांच्या कक्षामध्ये जावुन तेथे असलेल्या खुर्चीवर बसलो. सदर ठिकाणी माझ्या कामाबाबत चर्चा झाली त्यानंतर लामकाने यांनी माझे कामाचे मोजमापे पुस्तीका काढुन त्यावर माझे समोर सही केली व त्यांच्या टेबलच्या ड्रॉव्हर मधुन एक चॉकलेटी रंगाची डायरी काढली व ती उघडुन माझ्यासमोर ठेवली व हाताने इशारा करुन लाच रक्कम त्यामध्ये ठेवण्यास सांगीतली. त्याप्रमाणे मी माझ्या शर्टच्या खिशातुन लाचेची रक्कम काढुन सदर डायरी मध्ये ठेवुन 13,000/- रुपये आहेत असे सांगीतले त्यावर त्यांनी मान हालवत ती डायरी बंद करुन पुन्हा त्यांच्या टेबलच्या ड्रॉव्हर मध्ये ठेवली.
त्यानंतर मी माझ्या मोबाईलवरुन पोनि महाडिक यांना फोन करुन नियोजीत इशारा केला. त्यावरुन पोनि महाडिक, पंच 02 व सापळा पथक असे सदर ठिकाणी येवुन सहा. अभियंता लामकाने यांना 16.20 वा. चे सुमारास पकडले. सदर ठिकाणी पोनि महाडिक यांनी लामकाने यांना त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव सुनिल नेमीनाथ लामकाने, वय 57, सहा, अभियंता, गलीच्छ वस्ती सुधारणा विभाग, महानगर पालिका सोलापूर रा. डी 3, प्रियदर्शनी रेसीडन्सी, मरीआई चौक, सोलापूर असे असल्याचे सांगीतले. त्यानंतर पोनि महाडिक यांनी लामकाने यांना माझ्या बारामती बँक ते आकाशगंगा मंदीर येथील डांबरी रस्ताचे मोजमापे पुस्तीकेबाबत विचारणा केली असता, लामकाने यांनी त्यांच्या टेबलवर असलेली मोजमापे पुस्तीका पोनि महाडिक यांच्याकडे दिली, त्यानंतर सदर ठिकाणी लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करुन पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही अँन्टी करप्शन ब्युरो, सोलापूरच्या कार्यालयात पूर्ण करण्यात आली.
तरी दि. 16/02/2023 रोजीचे 12.50 ते 16.20 वा. च्या दरम्यान आरोपी लोकसेवक श्री. सुनिल नेमीनाथ लामकाने, सहा, अभियंता, गलीच्छ वस्ती सुधारणा विभाग, महानगर पालिका सोलापूर, यांनी आपले स्वत:चे पदाचा दुरुपयोग करुन मी केलेल्या शेळगी ते स्मशानभुमी येथील डांबरी रस्त्याच्या कामाचे मोजमापे पुस्तकावर सही करुन केलेल्या सहकार्याचा मोबदला म्हणुन तसेच बारामती बँक ते आकाशगंगा मंदीर येथील डांबरी रस्ता करणे या कामाच्या मोजमापे पुस्तकावर सही करण्याकरीता पार्क चौक येथील फोर जी चहाच्या कॅन्टीवर 13,000/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाच रक्कम सोलापूर महानगर पालिका गलीच्छ वस्ती सुधारणा विभाग येथील सहा. अभियंता कक्षामध्ये त्यांच्या डायरीमध्ये ठेवण्यास सांगुन स्वत: स्वीकारली आहे म्हणुन माझी आरोपी लोकसेवक श्री. सुनिल नेमीनाथ लामकाने, सहा. अभियंता गलीच्छ वस्ती सुधारणा विभाग, महानगर पालिका सोलापूर यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.
माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंट काढल्यानंतर मी वाचून

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.
समक्ष                                    हा फिर्यादी जबाब दिला स.ता.म.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Raghavendrasinh Abaji Kshirsagar(I (Inspector)) /          **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):                    **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)
पोलीस ठाणे अमलदार
**Name** (नाव): Raghavendrasinh Ab
सदर बझार पोलीस स्टेशन
**Rank**(पद): I
सोलापूर शहर
**No.**(सं.):